


Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)


ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL


# AJANTA


Volume - IX, Issue - II,
April - June - 2020
Marathi Part - II

Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts, Commerce & Science Colle
Mandangad.Dist.Ratnagiri.415

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | स्त्री-पुरूष समतेचे पुरस्कर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**प्रा. अजित दादू फाळके** | १-३ |
| २ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षण विषयक विचारांचा आढावा<br>**बांगर आकाश शेषराव** | ४-६ |
| ३ | पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**श्री. अरुण लक्ष्मीनारायण धकाते** | ७-१० |
| ४ | कामगार नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**डॉ. देवराव सुखदेवराव मनवर** | ११-१६ |
| ५ | स्त्री-पुरुष समतेचे पुरस्कर्ते - डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**प्रा. डॉ. दिलीप सावंत** | १७-१९ |
| ६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शैक्षणिक दृष्टिकोन<br>**डॉ. गणेश क. टाले** | २०-२४ |
| ७ | अर्थतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**डॉ. के. पी. पोले** | २५-२८ |
| ८ | समतावादी डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**डॉ. मिलिंदकुमार भिकाजी देवरे** | २९-३३ |
| ९ | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दलितेतरांसाठी योगदान<br>**प्रा. डॉ. नारायण नामदेव गाढे** | ३४-४० |
| १० | शिक्षणतज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**नवनाथ वि. नागरे** | ४१-४४ |
| ११ | महामानव, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**पद्माकर भारतराव काळे** | ४५-४९ |
| १२ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीविषयक कार्य<br>**प्रा. डॉ. प्रेमला मुखेडकर** | ५०-५३ |
| १३ | कृषीतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**प्रा. डॉ. राजकुमार कि. मून** | ५४-६० |





PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts,Commerce & Science College
Mandangad.Dist.Ratnagiri.415203

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | बाबासाहेब आंबेडकर यांच्या काळातील पाणी व्यवस्थापन<br>**प्रा. रामचंद्र महादेव संगशेट्टी** | ६१-६४ |
| १५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मनुस्मृती दहन<br>**प्रा. डॉ. रविन्द्र मुन्द्रे** | ६५-७२ |
| १६ | अर्थतज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**प्रा. डॉ. साहेबराव भानुदासराव शिंदे** | ७३-७६ |
| १७ | कामगार नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**प्रा. डॉ. गिरे संजय भाउराव** | ७७-८० |
| १८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकशाही विचाराची समकालीन प्रासंगिकता<br>**डॉ. संजय दगडु क्षीरसागर** | ८१-८७ |
| १९ | शिक्षणतज्ञ, युगप्रवर्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक योगदान<br>**डॉ. आवचर सीमा राधू** | ८८-९० |
| २० | डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय अर्थव्यवस्थेतील योगदान<br>**प्रा. स्मिता रा. देवर (भोंडे)** | ९१-९४ |
| २१ | सामाजिक आंदोलने / चळवळी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**डॉ. सुनिता तुकाराम राठोड (गोरे)** | ९५-९९ |
| २२ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषी विषयक कार्य<br>**प्रा. डॉ. राऊत उद्धव उमाजी** | १००-१०३ |
| २३ | कृषीतज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**डॉ. विनोद वासुदेव उपर्वत** | १०४-१०६ |
| २४ | धार्मिक विचार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**डॉ. रमेश धोंडीराम राठोड** | १०७-१११ |
| २५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री-पुरुष समानता विषयक विचार<br>**प्रा. डॉ. सुषमा सतिश देशपांडे** | ११२-११४ |
| २६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेती विषयक विचार<br>**डॉ. ढोले व्ही. एस.** | ११५-१२० |




PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts, Commerce & Science College
Mandangad, Dist. Ratnagiri. 415203

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रासंगिकता<br>**प्रा. सौ. सुपेकर वैशाली प्रशांत** | १२१-१२४ |
| २८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक निष्णात अर्थशास्त्रज्ञ<br>**डॉ. वाल्मिक दगडू परहर** | १२५-१३१ |
| २९ | विसंगत भारताच्या सद्यस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समाजवाद आणि सामाजिक न्यायाचे महत्त्व : एक दृष्टिकोन<br>**डॉ. विकास वाघू उबाळे** | १३२-१३५ |
| ३० | डॉ. बाबासाहेब आंबेडकर : सामाजिक चळवळी व आंदोलने<br>**प्रा. डॉ. विलास घोडे** | १३६-१४३ |
| ३१ | बाबासाहेब आंबेडकरांचे प्रशासकीय विचार<br>**लेफ्ट. डॉ. आर. पी. गावंडे** | १४४-१४८ |
| ३२ | भारतीय धर्मनिरपेक्षता आणि राजकारण<br>**डॉ. दत्तात्रय वाबळे** | १४९-१५२ |



PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts, Commerce & Science College
Mandangad, Dist. Ratnagiri 415203

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# २८. डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक निष्णात अर्थशास्त्रज्ञ

**डॉ. वाल्मिक दगडू परहर**
सहायक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मंडणगड,
ता. मंडणगड, जि. रत्नागिरी.

**गोषवारा**

भारतीय घटनेचे शिल्पकार, अस्पृश्यता यूग प्रवर्तक, दलितोद्धारक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, कायदाव्यवस्था अशा विविध क्षेत्रांचे दिशा दर्शक, एक थोर आर्थिक विचारवंत म्हणून विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव जगं विख्यात आहे. परंतु बाबासाहेबांची अर्थशास्त्रज्ञ म्हणून असणारी ओळख फारच दुर्मिळ आहे. त्यांच्या लेखनात 'ईस्ट इंडिया कंपनी: प्रशासन आणि अर्थनीती', 'ब्रिटिश भारतातील प्रतिक वित्तीय उत्क्रांती', रुपयाचा प्रश्न: त्याचा उगम आणि उपाय' 'प्राचीन भारताचा व्यापार' आणि 'भारताचा राष्ट्रीय लाभांश: इतिहासत्मक व विश्लेषणात्मक अध्ययन' हे आर्थिक विचारांची मांडणी करणारे महत्त्वाचे ग्रंथ आहेत. बाबासाहेबांचे आर्थिक विचार हे दलित, वंचित शोषित व उपेक्षितांच्या तत्कालिन समस्यांशी केंद्रीत असून ते भारतीय अर्थव्यवस्था, व्यापार, आर्थिक जातीव्यवस्था व अस्पृश्यता, भारतीय अंदाजपत्रके, कामगार कल्याण, भारतीय शेतीचा प्रश्न, चलनविषयक समस्या यामधून व्यक्त झालेले दिसून येतात. बाबासाहेबांच्या मते ''समाजातील आर्थिक संबंध हे राज्य समाजवाद आणि घटनात्मक कायदा, संसदीय लोकशाही या दोन मूलभूत संकल्पांवर आधारीत असावेत'' प्रस्तूत शोधनिबंध हा दुय्यम साधन सामुग्रीवर आधारित आहे. शोधनिबंधाविषयासंबंधित माहिती ही संदर्भ ग्रंथ, पाक्षिके, मासिके, नियतकालिके व संकेत स्थळे आदींमधून संकलित केली असून शोधनिबंधात भारतीय चलनव्यवस्थेचे मूल्याकन करताना चलनाच्या मूल्यात मोठया प्रमाणात झालेल्या बदलामुळे चलनाचे स्थैर्य राखण्यात अपयश येते. बाबासाहेबांचे शेतीविषयक विचार अनमोल असून ते विचार शेती व शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर यांच्या जीवनात नवचैतन्य व नवपरिवर्तन घडवून आणणारे आहेत. राज्य—समाजवादाच्या संकल्पनेत देशाची आर्थिक रचना कशी असावी यावर भर दिला असून त्यांनी शोषणविरहित आर्थिक संरचनेसाठी भांडवलशाही झुगारून सांसदीय लोकशाहीला स्थान दिले. भारतीय शेती व ग्रामीण भागातील आर्थिक व सामाजिक स्थिती बदलण्याचा एकच प्रभावी व खात्रीशीर मार्ग म्हणून औद्योगिकीकरणाचा स्विकार केला. शिक्षण ही महाशक्ती असून दारिद्रय, बेकारी व लोकसंख्या समस्या सोडविण्यासाठी शिक्षण हे एक दुधारी शस्त्र म्हणून वापरता येते.

**प्रस्तावना**

भारतीय घटनेचे शिल्पकार, अस्पृश्यता यूग प्रवर्तक, दलितोद्धारक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, कायदाव्यवस्था अशा विविध क्षेत्रांचे दिशा दर्शक, एक थोर आर्थिक विचारवंत म्हणून विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव जग विख्यात आहे. बाबासाहेबांनी आर्थिक, सामाजिक, राजकीय शैक्षणिक, जातीव्यवस्था आणि तत्कालिन विविध प्रश्नांवर वर्तमानपत्रे, विविध पुस्तके यांच्या माध्यमातून अतिशय



PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts,Commerce & Science College

दर्जेदार लेखन करून आपले विविध क्षेत्रातील एक व्यासंगी अभ्यासक व विचारवंत या नावाने जगावर प्रभूत्व मिळविले होते. स्वांतत्र्य, न्याय, समता आणि बधुत्व या तत्वावर आधारीत समाजव्यवस्था आणि अर्थव्यवस्था निर्माण करणे हे त्यांच्या जीवनाचे महत्त्वाचे तत्वज्ञान होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे घटनाकार, कायदातज्ञ, संसदपटू, पददलितांचे उध्दारक, राजनीतीतज्ञ, महान समाजसुधारक, शिक्षणतज्ञ, साहित्यिक यासारख्या अनेक पदव्यांनी सन्मानित झालेले एक सर्वश्रेष्ठ दर्जाचे अर्थशास्त्रज्ञ होते, परंतु त्यांची एक अर्थशास्त्रज्ञ म्हणून असणारी ओळख फारच दुर्मिळ आहे. त्यांच्या लेखनात 'ईस्ट इंडिया कंपनी: प्रशासन आणि अर्थनीती', 'ब्रिटिश भारतातील प्रतिक वित्तीय उत्क्रांती', रूपयाचा प्रश्न: त्याचा उगम आणि उपाय', 'प्राचीन भारताचा व्यापार' आणि 'भारताचा राष्ट्रीय लाभांश: इतिहासत्मक व विश्लेषणात्मक अध्ययन' हे आर्थिक विचारांची मांडणी करणारे महत्त्वाचे ग्रंथ आहेत. बाबासाहेबांचे आर्थिक विचार हे दलित, वंचित शोषित व उपेक्षितांच्या तत्कालिन समस्यांशी केंद्रीत असून ते भारतीय अर्थव्यवस्था, व्यापार, आर्थिक जातीव्यवस्था व अस्पृश्यता, भारतीय अंदाजपत्रके, कामगार कल्याण, भारतीय शेतीचा प्रश्न, चलनविषयक समस्या यामधून व्यक्त झालेले दिसून येतात. बाबासाहेबांच्या मते ''समाजातील आर्थिक संबंध हे राज्य समाजवाद आणि घटनात्मक कायदा, संसदीय लोकशाही या दोन मूलभूत संकल्पांवर आधारीत असावेत'' त्यांनी मांडलेल्या आर्थिक विचारांमध्ये प्रादेशिक वित्तीयव्यवस्था, चलनविषयक प्रश्न, प्राचीन भारताचा व्यापार, राज्य समाजवाद, कामगार कल्याण व भारतीय शेतीचा व श्रमिकांचा प्रश्न व दारिद्रय हे महत्त्वाचे टप्पे आहेत.

**संशोधन पद्धती**

प्रस्तूत शोधनिबंध हा दुय्यम साधन सामुग्रीवर आधारित आहे. शोधनिबंधाविषयासंबंधित माहिती ही संदर्भ ग्रंथ, पाक्षिके, मासिके, नियतकालिके व संकेत स्थळे आदींमधून संकलित केली आहे. या दुय्यम माहितीच्या आधारे सदर शोधनिबंध तयार केला असून शोधनिबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक निष्णात अर्थशास्त्रज्ञ म्हणून त्यांच्या आर्थिक विचारांवा आढावा घेण्यात आला आहे.

**संशोधनाची उदिष्टये**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चलनविषयक प्रश्न, भारतीय शेतीविषयक प्रश्न, भारतीय रूपयाचा प्रश्न, उद्योग, कामगार कल्याण व दारिद्रय आदिंसंबंधित आर्थिक विचार अभ्यासणे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचारातील योगदान

डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक निष्णात अर्थशास्त्रज्ञ म्हणून त्यांच्या आर्थिक विचारातील योगदानाचा वेगवेगळया टप्यांमध्ये अभ्यास करण्यात आला आहे. ते प्रमूख टप्पे खालील प्रमाणे सांगता येतात.

**चलनाविषयक विचार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रथमच सन १९२३ साली रुपयाचा प्रश्न: त्याचा उगम व उपाय (The Problem of the Rupee Its Origin and Solution) हा संशोधनात्मक ग्रंथ प्रसिद्ध झाला. त्यांनी या ग्रंथात भारतीय रुपयाच्या उत्क्रांतीचा ऐतिहासीक आढावा घेतला आहे. चालनविषयक विचार मांडताना त्यांनी सन १८०० ते १९२० या काळातील चलन मूल्यावर आधारित भारताचा रुपया व इंगलंडचा पौंड यांच्या संबंधिचा महत्वपूर्ण अभ्यास केला आहे. चलन पद्धतीबाबत सुवर्ण परिणाम स्विकारावी की सुवर्ण विनिमय परिमाण



**PRINCIPAL**
Loknete Gopinathji Munde
Arts,Commerce & Science College

स्विकारावी या बाबत वाद होते, परंतु भारतीय रुपयासाठी कोणती परिणाम पद्धती योग्य हा एक महत्त्वाचा वाद होता. प्रा. केन्स यांनी लवचिकता व भविष्यकालीन उपयूक्तता या गुणावर आधारित असणारी सुवर्ण विनिमय परिणामाचा पुरस्कार केला, मात्र डॉ. बाबासाहेब यांनी जगविख्यात अर्थतज्ञ लॉर्ड केन्स यांच्या विचारास प्रखर विरोध करून सुवर्ण परिणामाचा स्विकार केला. बाबासाहेबांच्या मते सुवर्ण विनिमय परिमाणात लवचिकता असले परंतु तिच्यात स्थैर्य नसून चलन निर्मितीवर मर्यादा राहत नाही. आवश्यकतेपेक्षा अधिक चलन निर्मितीतून भाववाढीमुळे रुपयाचे मूल्य घसरेल व विनिमय साधन म्हणून रुपयाचे असणारे स्थान अस्थिर होईल.

सन १८७३ नंतर जागतिक पातळीवर चांदीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाल्याने चांदीची किंमत कमी झाली. भारतात चांदीचा रुपया कायदेशीर चलन म्हणून स्विकारलेले होते, परंतु चांदीच्या घसरत्या किंमतीमुळे भारतीय रुपयाच्या अंतर्गत व बाह्य मूल्य यात तफावत निर्माण झाली. यामुळे चलन पद्धती अस्थीर बनली. यावर उपाय करण्यासाठी नियुक्त केलेल्या फाउलर समितीने सुवर्ण परिणामाबाबत अनुकूल मत व्यक्त केले. बाबासाहेबांनी भारतीय रुपयाचे मूल्य स्थिर ठेवण्यासाठी चलन निर्मितीवर मर्यादा, चांदीची नाणी बंद करावीत व कागदीचलन स्विकारावे हे उपाय सूचविले आहे. विशेष म्हणजे त्यांना चलन मूल्यासंबंधीचा मुद्रा मात्रा (चलन संख्यामान) सिद्धांत (Quantity Theory of money) मान्य होता.

भारतात भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना ब्रिटश काळात झाली परंतु त्या बँकेची संकल्पना, मार्गदर्शक तत्वे, कार्यपद्धती, दृष्टीकोन आणि देशातील भ्रष्टाचार आणि काळापैसा रोखण्यासाठी चलन दर दहा वर्षानी अचानक बदलणे ही सर्व देणगी बाबासाहेबांची दिलेली आहे.

**प्रादेशिक वित्तसंबंधिचे विचार**

डॉ. बाबासाहेबांची ब्रिटीश भारतातील प्रांतिक वित्तीय उत्क्रांती (१९२५) या ग्रंथात सन १८३३ ते १९२१ या काळात ब्रिटीश सरकार व घटक राज्य यांच्या वित्तीय संबंध कसे झाले. या विशयी विचार मांडले आहेत. सन १८३३ ते १९७१ पर्यंत भारतीय सरकारच्या वित्तीय व्यवस्थेचे स्वरूप पूर्णत: केंद्रीय स्वरूपाचे असून महसूल गोळा करणारी शासनव्यवस्था केंद्रीय पद्धतीची होती. घटक राज्यांच्या खर्चाची पूर्तता करण्याची जबाबदारी केंद्र सरकारची होती. घटक राज्यांना उत्पन्न मिळविण्याचे अधिकार नव्हते. बाबासाहेबांनी उचलून दिलेल्या रक्कमे पूरते अंदाजपत्रक (Budget by Assignment) (१८७१—७२ ते १८७६—७७), ठरवून दिलेल्या महसूलावर आधारित अंदाजपत्रक (Budget by Assignd Revenus) (१८७७—७८ ते १८८१—८२) आणि महसूलाच्या वाटपावर आधारित अंदाजपत्रक (Budget by Shared Revenus) (१८८२—८३ ते १९२०—२१) अशी तीन गटात वित्तीय विश्लेषण केले आहे. सन १८८५ साली भारतीय वित्तीय व्यवस्थेचे विक्रेंद्रीकरण करण्यात आले.

डॉ. बाबासाहेबांच्या मते ब्रिटीशकालिन भारतीय कर रचना म्हणजे एक प्रकारची क्रूर चेष्टा होती. तीच्यात सामाजिक न्याय अभावानेच दिसून येत होता. यूरोपीय सनदी नोकरांचा कर माफ करण्यात आला परंतु भारतीय गरीबांवर मीठ व इतर अन्य जुलमी कर लादले जात होते. या अन्यायकारी कर पद्धतीमुळे कर भरण्याबाबात लोकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण होत असून कर रक्कमेतून वसूल महसूलाचा वापर बेजबाबदार



PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts, Commerce & Science College

पद्धतीने केला जात होता. एकूण कर महसूलाच्या ५० ते ८० टक्के रक्कम युद्धावर खर्च केली जात असे परिणामी संरक्षणावरील खर्चातील बेसुमार वाढीमुळे विकासावर खर्च केला जात नव्हता.

**भारतातील शेतीचा प्रश्न**

डॉ. बाबासाहेबांच्या आर्थिक लिखाणात एक उल्लेखनीय विचार म्हणून भारतीय शेतीचा विचार करावा लागतो. बाबासाहेबांनी कृषी उद्योग हा भारताचा एक राष्ट्रीय महान उद्योग मानला आहे. या सर्वश्रेष्ठ राष्ट्रीय उद्योगाच्या दयनीय अवस्थेच्या अनेक कारणांपैकी लहान आकाराचे धारणक्षेत्र, त्याचे तुकडीकरण व विखुरलेली स्थिती ही महत्त्वाची कारणे आहेत. या संदर्भात त्यांचा १९१८ मध्ये 'भारतीय अल्पधारणा क्षेत्रे व त्यावरील उपाययोजना' (Small Holding in India & their Remedies) हा शोधनिबंध "The Journal of India Economic Society" मध्ये प्रकाशित झाला होता. या लेखात अनेक देशांचा अभ्यास करून अकिफायतशीर व विखुरलेले धारणक्षेत्रांचा शेतीवर विपरीत परिणाम होतो तसेच मुंबई प्रांताच्या कायदे मंडळात १० ऑक्टोंबर १९२७ व ३१ जून १९२८ मध्ये 'अल्पभूधारक सहाय्य विधेयक' मांडून त्यात सामाजिक न्यायाच्या दृष्टीने तुकडीकरण उपयुक्त असेल तरी अल्पभूधारण क्षेत्रामुळे आधुनिकीकरण, मसागत खर्च वाढ अशा अनेक समस्या निर्माण होतात हे विचार व्यक्त केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सामुहिक शेतीचे पुरस्कर्ते होते. त्याच्या मते अल्पभूधारकाच्या समस्या सोडविण्याचा अनमोल मार्ग म्हणजे सामुहिक शेती असून इटली, फ्रन्स व इंग्लडमध्ये सामुहिक शेतीचे तत्व उपयूक्त ठरले आहे ते भारतातही उपयुक्त आहे. डॉ. बाबासाहेबांनी महार वतन पद्धतीने बंद करण्याची गरज व्यक्त केली कारण यापद्धतीमुळे या समाजातील माणसांची महत्त्वकांक्षा मारली जात आहे. खोती ही जमीन कसण्याची अन्यायकारक पद्धती असून खोतीमुळे केवळ आर्थिक गुलामगिरीच नव्हे तर सामाजिक गुलामगिरी लादली जात आहे. त्यामुळे खोती पद्धती समूळ नष्ट करण्यासाठी त्यांनी १७ नोव्हेंबर १९३७ ला मुंबई प्रांताच्या कायदे मंडळात ''खोती पद्धती निर्मूलन विधेयक'' मांडले. बाबासाहेबांनी राज्य—समाजवादाच्या संकल्पनेत शेती हा राज्याच्या अखत्यारितील व्यवसाय आहे असे मत मांडले. शेतीला सर्वकाळ, मुबलक आणि समान प्रमाणात पाणी पुरवठयासाठी जल व्यवस्थापनाची गरज व्यक्त केली असून पाणी तीव्रतेवर मात करण्यासाठी नदी जोड प्रकल्पांची संकल्पना मांडली होती.

एकंदरीत अल्पभूधारकांना न्याय, तुकडीकरण प्रतिबंध, खोती पद्धतीचे समूळ उच्चाटन, कुळांचे आर्थिक व शारीरीक शोषण थांबविण्यासाठी खंडाचे दर नियमित करणे, कुळांना संरक्षण व मालकी हक्क बहाल करणे इत्यादी उपाय सांगितले आहेत.

**औद्योगिकीकरणासंबंधित विचार**

डॉ. बाबासाहेब यांच्या आर्थिक विचारातील औद्योगिकीकरण हा महत्त्वाचा टप्पा मानला जातो. त्यांच्या मते भारतीय शेतीचे प्रश्न सोडविण्यासाठी औद्योगिकीकरण हा एकच प्रभावी व खात्रीशीर मार्ग आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागातील आर्थिक व सामाजिक स्थिती बदलण्यासाठी औद्योगिकीकरण हा एक महत्त्वाचा पर्यायी मार्ग आहे. त्यांनी उद्योगांचे मुलभूत उद्योग, आवश्यक उद्योग व पुरक उद्योग असे वर्गीकरण केले असून मुलभूत उद्योग केंद्रसरकारच्या अखत्यारित असावेत. आवश्यक उद्योगांची वाटणी केंद्र व राज्यसरकार तर काही ठिकाणी उद्योग दोन्हींच्या सहभागाने कार्यरत असावेत. पुरक अथवा कमी महत्त्वाचे उद्योग खाजगी



PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde

क्षेत्राकडे सोपविण्यात यावेत. दुसऱ्या शब्दात असे म्हणता येते की, बाबासाहेबांनी आर्थिक लोकशाही निर्माण करणे आणि गरीब लोकांचे आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी औद्योगिकीकरणाला महत्त्व दिलेले आहे.

**राज्य—समाजवाद संकल्पनेतील विचार**

डॉ. बाबासाहेबांच्या आर्थिक विचारांमधील राज्य—समाजवादाची संकलपना हे त्यांचे मौलिक योगदान आहे. देशातील अल्पसंख्यांक आणि दलित, शोषित पिढीतांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे म्हणून राज्य—समाजवादाची संकल्पना त्यांनी आपल्या स्टेट्स अॅन्ड मायनॉरिटिज (States and Minorities) या अप्रतिम ग्रंथात मांडली. राज्य—समाजवादाची संकल्पना म्हणजे भारतातील केवळ आर्थिकच नव्हे तर सामाजिक स्थितीचे मांडलेले 'समाजवादाचे भारतीय प्रारूप' आहे. राज्य—समाजवादामध्ये देशाची आर्थिक संरचना कशी असावी यावर भर दिला आहे. बाबासाहेबांच्या मते राज्य—समाजवादाचा समावेश घटनेत करावा आणि तो अंमलात आणण्यासाठी सांसदीय लोकशाही असावी तरच हुकूमशाही दूर होऊन लोकशाही टिकू शकते. त्यासाठी घटनेच्या राजकीय व आर्थिक बाजू महत्त्वाच्या असून शास्त्रीय समाजवाद आणि निर्हस्तेपक्षेप नीती यांना विरोध करून आर्थिक संरचनेचा आधार म्हणून मिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार केला.

डॉ. आंबेडकरांना राज्य—समाजवादाच्या माध्यमातून भांडवलशाहीवर नियंत्रण आणवयाचे होते. राज्य—समाजवादात अर्थव्यवस्थेचे स्वरूप स्पष्ट करत असताना त्यांनी यांत्रिकीकरणाचे समर्थन केले. औद्योगिकीकरण हा देशाच्या मागासलेपणावर उपाय असून जलद औद्योगिकीकरणासाठी राज्य—समाजवादाला पर्याय नाही. भांडवलशाहीप्रमाणे खाजगी क्षेत्राला प्रधान्य दिले तर विकासाबरोबरच संपत्तीच्या वाटपातील विषमता वाढू शकते म्हणून पायाभूत मूलभूत उद्योग सरकारच्या मालकीचे असावेत, तसेच शेती, व विमा या क्षेत्रांवर सरकारची मालकी असावी. विमा व बॅकांचे राष्ट्रीयीकरण करून विमा क्षेत्राची मालकी पूर्णपणे राज्यसत्तेच्या अधिपत्याखाली असावी. त्यांनी राज्य—समाजवादामध्ये शेतीला अन्यनसाधारण स्थान दिले असून शेती हा राज्याच्या अखत्यारित्यातील उद्योग असेल असे घोषित केले. कृषी उद्योगाचे राष्ट्रीयीकरण करण्यात यावे. राज्याच्या अखत्यारित्यातील ''शेतीमध्ये सामूदायिक पद्धतीची लागवड आणि उद्योगांमध्ये सौम्य स्वरूपात राज्य—समाजवाद'' हा त्यांच्या आर्थिक रचनेचा मूळ पाया होता.

**दारिद्रयविषयक विचार**

डॉ. बाबासाहेबांनी दारिद्रयासंबंधी मर्मिक विचार मांडले असून शेतजमीनीचे लहान लहान तुकडीकरण व जमीनीवरील लोकसंख्येचा वाढता भार ही शेतकऱ्यांच्या दारिद्रयाची कारणे आहेत. शेतकऱ्यांची दारिद्रयाची समस्या दूर करण्यासाठी राज्य—समाजवादात शेतजमीनीची खाजगी मालकी रद्द करून त्याऐवजी सामूहिक मालकी प्रस्थापित करावी असे त्यांचे मत होते. तसेच सामूहिक शेतीच्या माध्यमातून दारिद्रयाचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

**इतर आर्थिक विचार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अर्थशास्त्राचे स्वरूप, नियोजित अर्थव्यवस्था, जाती व्यवस्था, कामगार, शिक्षण, महिला, लोकसंख्या आदीविषयांसंबंधित विचार मांडले आहेत.

बाबासाहेबांच्या मते अर्थशास्त्रात संपत्ती व आर्थिक व्यवहारांबरोबरच सामाजिक कल्याणाचा अभ्यास आवश्यक आहे. संपत्तीचे सर्व वर्गामध्ये समान वाटप हा त्यांचा आग्रह होता. जाती व्यवस्था ही श्रमिकांच्या



PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts,Commerce & Science College

अनैसर्गिक विभागणीस कारणीभूत ठरत असून ती देशाच्या आर्थिक विकासावर विपरित परिणाम करत आहे म्हणून त्यांनी स्टेट्स ॲन्ड मायनॉरिटिज (States and Minorities) या ग्रंथात गरीबी हटाव, विषमता निर्मूलन आणि शोषण मुक्तता यावर भर दिला. सन १९३६ मध्ये मजूर पक्ष स्थापन करून त्याच्या जाहिरनाम्यात शेती, उद्योग, कामगार शोषण व त्यांचे वेतन, कामगार कल्याण योजना, बेकारी निर्मूलन आणि सावकारी उच्चाटन व नियंत्रण इत्यादींसारख्या आर्थिक धोरणाबाबत विचार मांडले. डॉ. बाबासाहेब (१९४२—४६) मजूर मंत्री असताना कामगार हिताचे अनेक निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी केली हे त्यांच्या विचाराचे एक प्रतिक आहे.

डॉ. बाबासाहेबांच्या मते शिक्षण ही एक महाशक्ती आहे. त्यांनी दारिद्रय, बेकरी व लोकसंख्या समस्या सोडविण्यासाठी शिक्षणावर भर दिला. प्रत्येकाला शिक्षण मिळाले पाहिजे ही शासनाने जबाबदारी घेऊन सर्वांना सक्तीचे व मोफत शिक्षण दिले पाहिजे. त्यांच्या मते 'शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे ते दुध जो कोणी प्राशन करेल तो एक दिवस गुरगुरल्याशिवाय राहणार नाही' इतकी मोठी ताकत शिक्षणात आहे. शिका, संघटीत व्हावा आणि संघर्ष करा हा त्यांच्या शिक्षणातून समाज विकासाचा मूलमंत्र होता. बाबासाहेबांनी नियोजित अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून देशातील लोक आणि उत्पादन प्रक्रिया यांच्यातील परस्पर संबंध, उत्पादन संबंध व आर्थिक विकास, समाजातील उत्पन्नाचे समान वाटप, राष्ट्रीय संपत्तीचे समान वाटप, या सर्वांचा सामाजिक कल्याणाशी असलेला संबंध मांडला आहे.

**निष्कर्ष**

भारताच्या कीर्तीवंत सुपुत्रांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव अग्रस्थानी आहे. बाबासाहेब एक थोर विचारवंत होते. त्यांचे राजकीय, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील योगदान उल्लेखनीय आहे. त्यांनी अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, कायदातज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, पत्रकार, संसद सदस्य आणि याही पलिकडे जाऊन समाजसुधारक व मानवाधिकारांचा रक्षण या नात्याने केलेले कार्य अतुलनीय आहे. विशेष बाब म्हणजे ते आपल्या देशाच्या इतिहासातील पहिले सर्वश्रेष्ठ व जगविख्यात अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांनी अर्थशास्त्रज्ञ म्हणून चलन पद्धती, शेती, औद्योगिकीकरण, खाजगी सावकार प्रतिबंधक विधेयक, सार्वजनिक आयव्यय आर्थिक पायाभरणी इत्यादी विषयावर विचार मांडले असून त्यांचे भारतीय रिझर्व्ह बॅकेच्या स्थापनेत मोलाचे योगदान आहे.

डॉ. बाबासाहेबांचे आर्थिक विचार हे दलित—शोषितांच्या तत्कालिन समस्यांशी केंद्रीत आहेत. त्यांच्या मते भारतीय चलनव्यवस्थेचे मूल्याकन करताना चलनाच्या मूल्यात मोठया प्रमाणात झालेल्या बदलामुळे चलनाचे स्थैर्य राखण्यात अपयश येते. त्यांनी भारतीय चलन व्यवस्थेबद्दल १९२३ साली केलेली मांडणी ही सद्यस्थितीतही तेवढीच सूचक आहे. बाबासाहेबांचे शेतीविषयक विचार अनमोल असून ते विचार शेती व शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर यांच्या जीवनात नवचैतन्य व नवपरिवर्तन घडवून आणणारे आहेत. शेतीविषयक मांडलेले तत्कालिक विचार हे आधुनिक काळातही अत्यंत उपयूक्त असून स्वातंत्र्योत्तर काळात कृषी व शेतकऱ्यांच्या विकासासाठी याच कार्यक्रमांच्या आधारावर उपाय केलेले दिसून येतात. राज्य—समाजवादाच्या संकल्पनेत देशाची आर्थिक रचना कशी असावी यावर भर दिला असून त्यांनी शोषणविरहित आर्थिक संरचनेसाठी भांडवलशाही झुगारून सांसदीय लोकशाहीला स्थान दिले. भारतीय शेती व ग्रामीण भागातील



PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts, Commerce & Science College
Mandangad, Dist.Ratnagiri 415203

आर्थिक व सामाजिक स्थिती बदलण्याचा एकच प्रभावी व खात्रीशीर मार्ग म्हणून औद्योगिकीकरणाचा स्विकार केला.

बाबासाहेब संपत्ती व उत्पन्न यांच्या यांच्या समान वाटप आणि सामाजिक कल्याण व कामगार कल्याणाबाबत आग्रही असून त्यांनी बेकारी, दारिद्रय, विषमता निर्मूलन आणि शोषण मुक्तता यावर भर दिला. याशिवाय जाती प्रथेत आर्थिक पीछेहाट कशी होते यासंबंधिचे विवेचन केले तर शिक्षण ही महाशक्ती असून दारिद्रय, बेकारी व लोकसंख्या समस्या सोडविण्यासाठी शिक्षण हे एक दुधारी शस्त्र म्हणून वापरता येते.

**संदर्भ**

1. प्रा. देवेंद्र देशमुख, श्रीमती. अंजली जोशी (अनुवादक), 'रुपयाचा प्रश्न त्याचा उद्‌गम व उपाय' विनिमय प्रकाशन, मुंबई, २०११.
2. डॉ. बी. डी. कुलकर्णी, डॉ. एस. व्ही. ढमढेरे, 'आर्थिक विचार व विचारवंत' डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०१७, पृष्ठ क्र. २४९ ते २६१.
3. डॉ. विजय कविमंडन, 'आर्थिक विचारांचा इतिहास' श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, २००९, पृष्ठ क्र. ३७० ते ३७८.
4. B. S. Jadhav (Chief Editar), 'Contribution of D. Babasaheb Ambedkar in Economic Thoughts' (Proceeding Book), International E Publication, 2016, Page No. 263 to 357.
5. अर्थसंवाद त्रैमासिक, मराठी अर्थशास्त्र परिषद, खंड–४०, अंक–१, एप्रिल–जून–२०१६, पृष्ठ क्र. ०३ ते १०२.
6. सुरेश बी. गोलाईत, 'अर्थसंवाद त्रैमासिक'(लेख–डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारताच्या विकासातील आर्थिक तत्वज्ञान) मराठी अर्थशास्त्र परिषद, खंड–३७, अंक–४, जाने–मार्च–२०१४, पृष्ठ क्र. ४१९ ते ४२४.

PRINCIPAL
Lokneta Gopinathji Munde
Arts, Commerce & Science College